# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/संकिर्ण/२०२१/ 5633 दिनांक : 17 DEC 2021

प्रति,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्था
(पुणे विभाग) पुणे

विषय – दिनांक २५-०८-२०२० रोजी सह्याद्री देवराई सामाजिक संस्था, मुंबई याच्या निवेदनाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत

संदर्भ – १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक.१६/आस्था/संकिर्ण-२०२०/१६२ दि.२८-०९-२०२०
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक.१६/आस्था/संकिर्ण-२०२१/५ दि.०७-०१-२०२१
३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.१३४/आस्था-२ दि. ३१-१२-२०२०

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र १ नुसार आपणास अनुपालन अहवाल सादर करणेसाठी सूचित करणेत आलेले होते. तथापि संदर्भ क्र २ नुसार आपणास पुनःश्च कळविणेत येते की, महसूल व वन विभाग यांच्या संदर्भीय पत्र क्र सावधि २०२०/प्र.क्र.५१/फ.११ दि. १८-०९-२०२० चे पत्राच्या अनुषंगाने दि. २५-०८-२०२० रोजी मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली व सह्याद्री देवराई सामाजिक संस्था, मुंबई याच्या निवेदनाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्ताप्रमाणे मुद्दा क्र. २ च्या निर्णयानुसार पुणे विभागातील सर्व संस्थांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशावेळी झाडांची रोपे, देऊन त्यांचे संगोपन करण्याकरीता शैक्षणिक संस्थांच्या नर्सरी तयार करणे आणि स्वायत्त संस्थांनी अभ्यासक्रमात पर्यावरण व वृक्ष परिचय ह्याबद्दल एक विषय शैक्षणिक सत्रात समाविष्ट करावा व त्यासाठी विशेष गुण देण्याची तरतूद करणे. तसेच सर्व संस्थानी वृक्ष लागवडीत विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेवून एक रोप भेट देऊन त्याचे संगोपन करण्याकरीता प्रोत्साहीत करावे. स्वायत्त संस्थांनी यथोचीत सदर उपक्रमासाठी गुण देण्याबाबत धोरण निश्चित करावे. तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास **दि. २२-१२-२०२१** पर्यंत सादर करावा जेणेकरुन याबाबतचा अहवाल मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

(श्री. मा.रा. जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

सोबत - संदर्भाधीन पत्रे

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597436,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

ईमेलव्दारे

पत्र क्रमांक : 16/आस्था/संकीर्ण/2020/९६२
दिनांक : 28 SEP 2020

प्रति,

1) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

2) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील बैठक दि.25.8.2020 सहयाद्री देवराई सामाजिक संस्था, मुंबई यांचे निवेदन.

उपरोक्त विषयाबाबतचे महसूल व वन विभाग यांचे पत्र क्रमांक साववि-2020/प्र.क्र.51/फ.11 दिनांक 18.9.2020 चे पत्र सोबत जोडत आहे.

सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, दिनांक 25.8.2020 रोजी मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली सहयाद्री देवराई सामाजिक संस्था, मुंबई यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. तरी, आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये यांना मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाराष्ट्र शासन

उ.मु.प.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 4124.707
दि. 22/9/2020

क्र.सावनि-२०२०/ प्र.क्र.५१/ फ-११
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १८.०९.२०२०

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (नियोजन) ,मंत्रालय ,मुंबई
२. अपर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक ,सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, पुणे.

मुद्दा क्र. 2 बाबत
DHE / DTE / Dir. Arts
कडून अहवाल मागवावे
249

विषय: मा .उपमुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील बैठक- दि.२५ .०८.२०२०.
सह्याद्री देवराई सामाजिक संस्था ,मुंबई यांचे निवेदन.

महोदय,

मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२५.०८.२०२० रोजी सह्याद्री देवराई सामाजिक संस्था, मुंबई यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या बैठकीचे कार्यवृत्त सोबत पाठविण्यात येत आहे. तरी, सदर कार्यवृत्तातील मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

(अरविंद आपटे)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

सहपत्र: वरीलप्रमाणे

DS/K
(सार्व)

मा.ना. श्री. अजित पवार. उपमुख्यमंत्री. महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५/०८/२. रोजी सह्याद्री देवराई सामाजिक संस्था. मुंबई यांच्या निवेदनाच्या संदर्भात आयोजित केलेल्या बैठकीचे कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस ना. मा.श्री. संजय राठोड, मा. मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, तसेच खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | अधिका-यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.देवाशिष चक्रवर्ती | अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई |
| २ | श्री.नितीन करीर | अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई |
| ३ | श्री. मिलींद म्हैसकर | प्रधान सचिव ( वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ४ | डॉ दिनेश कुमार त्यागी | प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे |
| ५ | श्री. विवेक खांडेकर | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(मुख्यालय), सामाजिक वनीकरण, म.रा. पुणे |
| ६ | श्री. अरविंद आपटे | मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) |
| ६ | श्री. योगेश अमेटा | सह सचिव, विधी व न्याय |
| ७ | श्री.नितीन जिवणे | अवर सचिव, विधी व न्याय |
| ८ | श्रीमती नेहा दुमरसकर | कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण |
| ९ | श्री. सयाजी शिंदे व इतर सदस्य | सहयाद्री फाउंडेशन |

सुरुवातीस अध्यक्ष महोदयांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली. सह्याद्री देवराई संस्थेने त्यांनी वनीकरण संबंधात करत असलेल्या कामाची चित्रफीत दाखवून माहिती दिली. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सा.व.) यांनी वन विभागाच्या रोपवाटिकामध्ये उच्च तंत्राव्दारे रोपे निर्मिती तसेच विभागामार्फत केल्या जाणाऱ्या वनीकरणाबाबत सर्वांना अवगत केले. सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | मुद्दा | मा.उप मुख्यमंत्री यांचे निर्देश | संबंधित विभाग | अंमलबजावणी पूर्ण होण्यास अपेक्षित कालावधी. |
|---|---|---|---|---|
| १ | रोपवाटिका बाबत- सामाजिक वनीकरण व वनीकरण विभाग, कृषी विभाग, कृषी विभाग महसूल विभाग रोपाची उंची ३ ते ५ | महाराष्ट्रातील सर्व शासकीय रोपवाटीकेमध्ये लोकांची मागणी इत्यादी विचारात घेऊन जास्तीत जास्त स्थानिक प्रजातींचे | वन विभाग / कृषी विभाग. | ---- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | फुटाची तयार करावी. वय १.५ ते २.५ वर्षाची व स्थानिक देशी प्रजाती असावी. विविधता याबाबत चर्चा करणे. | वृक्षांची उंच रोपे तयार करणे व त्यांच्या लागवडीसाठी प्रोत्साहन देण्यात यावी. | | |
| २ | शिक्षण-शाळा, महाविद्यालयात प्रवेशा वेळी झाडांची रोपे. देऊन संगोपन व शैक्षणिक संस्थांच्या नर्सरी तयार करणे आणि पर्यावरण विषयाचे एक विषय शैक्षणिक सत्रात समाविष्ट करणे व त्यासाठी विशेष गुण देण्याची तरतूद. | वृक्ष परिचयाचा शाळेच्या अभ्यासक्रमात समावेश करणे तसेच वृक्ष लागवडीत विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यासाठी त्यांना दरवर्षी एक रोप भेट देऊन त्याचे संगोपन करण्याकरीता यथोचीत गुण देण्याबाबत धोरण निश्चित करण्यात यावे. | शालेय शिक्षण / उच्च तंत्रशिक्षण विभाग. | ३ महिने |
| ३ | जिल्हाधिकारी/तहसीलदार यांच्याकडून जिल्हास्तरीय ठिकाणी सहयाद्री देवराई संस्थेस काम करताना शासनाची यंत्रणेचे सहकार्य मिळण्यासाठी शासनाने आदेश जारी करावा. | सह्याद्री देवराई फाऊंडेशन यांना वृक्षलागवड व रोपवाटीका कार्यक्रमासाठी शासकीय यंत्रणांनी आवश्यक सहकार्य करण्याबाबत परिपत्रक जारी करण्यात यावे. | महसूल, ग्राम विकास, वन विभाग. | १ महिना |
| ४ | देवस्थान ट्रस्ट कडे ज्या जागा उपलब्ध आहेत त्या ठिकाणी सहयाद्री देवराई/देवस्थान/शासन यांच्या सहकार्याने रोपवाटीका तयार करुन वृक्ष लागवड व सर्व भक्तांना प्रसाद रुपी झाडांचे वाटप करण्यात यावे. | अशा देवस्थान ट्रस्टच्या प्रशासकांना देवस्थानाच्या रोपवाटीका तयार करुन वृक्ष लागवड व सर्व भक्तांना प्रसाद रुपी झाडांचे वाटप करणे शक्य आहे का याबाबत पडताळणी करण्याचे निर्देश द्यावेत. | महसूल विभाग/विधी व न्याय विभाग | ३ महिने |
| ५ | गाव तेथे देवराई या करिता ग्रामविकास विभागामार्फत स्थानिक स्वराज्य संस्था नगरपालिका/महानगरपालिका यांना सहभागी करुन घेणेबाबत (ग्राम विकास विभाग) | प्रत्येक तालुका स्तरावर वनविभाग, सामाजिक वनीकरण, खाजगी रोपवाटीका, महसूल विभागाच्या अखत्यारीतील जागा तसेच देवस्थानांच्या जागांवर एक एकर क्षेत्रावर | वनविभाग, ग्रामविकास विभाग, महसूल विभाग, विधी व न्याय विभाग | ३ महिने |
| ६ | २०२१ च्या १५ ऑगस्ट ७५ | देवराई निर्माण करणे | वन विभाग | |

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597436,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

पत्र क्रमांक : 16/आस्था/संकीर्ण/2021/5 दिनांक : ०१/१/२०२१

ईमेलव्दारे

प्रति,
1) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

2) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : दिनांक 25.8.2020 रोजी सह्याद्री देवराई सामाजिक संस्था, मुंबई यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ : 1) या संचालनालयाचे पत्र क्रमांक 16/आस्था/संकीर्ण/2020/162, दिनांक 28/9/2020
2) उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-2020/प्र.क्र.134/आस्था-2, दिनांक 31/12/2020

उपरोक्त विषयाबाबतच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भांकित पत्र क्रमांक 2 मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्याचे निर्देश आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांना आपल्या स्तरावरून देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास पाठवावा जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०२० /प्र.क्र,१३४ /आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक -३१.१२.२०२०

प्रति,

उप सचिव विशि /मशि/तांशि /साशि उच्च व तंत्र शिक्षण
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय,पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई.
संचालक, कला शिक्षण संचालनालय,मुंबई.

विषय-दिनांक २५.८.२०२० रोजी सह्याद्री देवराई सामाजिक संस्था मुंबई यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत ...

संदर्भ- मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयाचे दिनांक १८/१२/२०२० चे पत्र

महोदय,

सोबत जोडलेले संदर्भाधीन पत्र व बैठकीचे कार्यवृत्त कृपया पहावे .

सोबत जोडलेल्या कार्यवृत्तातील मुद्दा क्र.२ "शाळा महाविद्यालय येथे प्रवेशावेळी झाडांची रोपे देऊन संगोपन करणे व शैक्षणिक संस्थांच्या नर्सरी तयार करणे आणि पर्यावरण विषयाचे एक विषय शैक्षणिक सत्रात समाविष्ट करणे व त्यासाठी विशेष गुण देणे " यावर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने कार्यवाही करावयाची आहे.

यातील अभ्यासक्रमात पर्यावरण विषयाच्या एक विषयाचा समावेश शैक्षणिक सत्रात करणे या मुद्द्याबाबत तंत्र शिक्षण / विद्यापीठ शिक्षण /महाविद्यालय शिक्षण /कला शिक्षण या उपविभागांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यासनास सादर करावा.व प्रवेशावेळी विद्यार्थांना झाडाचे रोप देऊन त्याचे संगोपन करणे या बाबत उच्च शिक्षण संचालनालय /तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांनी आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास त्वरित सादर करावा हि विनंती.

(अमोल उगलमुगले)
कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन

स्मरणपत्र क्र.१

उप मुख्यमंत्र्यांचे कार्यालय
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
dcm@maharashtra.gov.in

दिनांक : १८/१२/२०२०

प्रति,

१) मा. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन मंत्रालय, मुंबई.
३) मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
५) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) मा. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विषय: दिनांक २५.०८.२०२० रोजी सह्याद्री देवराई सामजिक संस्था, मुंबई यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ** :१. महसूल व वन विभागाचे प्रत्र क्र. साववि-२०२०/प्र.क्र. ५१/ फ-१, दिनांक १८.०९.२०२०
२.या कार्यालयाचे दि.०९.११.२०२० चे पत्र

**महोदय,**

मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५.०८.२०२० रोजी सह्याद्री देवाराई सामजिक संस्था, मुंबई यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या बैठकीचे कार्यवृत्त आपणांकडे संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रासोबत पाठविण्यात आलेले आहे. सदर कार्यवृत्तातील मुद्यांवर मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार विहीत कालावधीत आपल्या विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या अवलोकनार्थ तात्काळ सादर करण्याची विनंती संदर्भाधीन क्र.२ च्या पत्रान्वये आपणास करण्यात आली होती. तथापि, सदर माहिती अद्यापही या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. सबब, सदर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(सचिन बाभळगांवकर)
कक्ष अधिकारी
०२२-२२०२२४०१/२२०२५०१४